अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
MO.9860898564
संपादक - दिपक थोरात



## दुष्काळात दुष्टकाळ...
## आस्मानी हल्ल्यात शेतकऱ्यांचे हाल !

परतूर (प्रतिनिधी)

पावसाळ्यात दडी मारून बसलेल्या पावसाने काल उग्र रूप धारण करत काल रात्री झालेल्या अवकाळी पावसाचा फटका परिसरातील पिकांना बसत, फळ बागायतदार शेतकरी उत्पादकांसमोर नवीन संकट उभे ठाकले आहे.ठीक ठिकाणी ऊसतोडणीच्या कामाला वेग आले असून आत्ता काही दिवस  काम स्थगित होण्याची चिन्हे आहेत सोबतच ऊसतोड मजुरांचे देखील हाल होणार आहेत, शासनाने पुढाकार घेऊन या सर्व बाबींवर लक्ष केंद्रित करून जलदगतीने योग्य ते निर्णय घेणे गरजेचे आहे. वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात ठीक ठिकाणी गारा पडल्याच्या सुद्धा बातम्या आहेत.या नव्याने आलेल्या संकटांना सामोरे जाण्यासाठी शासन स्तरावर काय उपाय योजना केल्या जातात हे पाहणं गरजेचं आहे मात्र नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून योग्य तो मुवावजा शेतकऱ्यांच्या पदरी पडवा  अशी अपेक्षा शेतकरी वर्गातून केल्या जात आहे.

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -६८ | सोमवार दि.२७ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -68 | MONDAY DT.27 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |

# बीड हिंसाचारातील आरोपींचे फोटो एकनाथ शिंदेंसोबत

## शरद पवार गटातील नेत्याची पोस्ट; भाजप स्पष्टीकरण देणार का? असा सवाल





**मुंबई / प्रतिनिधी**

**गेल्या काही दिवसांपासून जाळपोळ, हिंसाचार, ड्रग्ज प्रकरणातील आरोपींचे फोटो नेत्यांसोबत असल्याचे दाखवून एकमेकांना बदनाम करत आरोप-प्रत्यारोप करण्याचे काम राज्यातील राजकारण सुरु आहेत. आंतरवालीतील दगडफेकीमागचा मुख्य सुत्रधाराचा फोटो शरद पवारांसोबत असल्याचे ट्विट करत निलेश राणे यांनी सवाल केले होते. भाजप खासदारावर दगडफेक करणाऱ्या आरोपीचे फोटो शरद पवारांसोबत पोस्ट करण्यात आले होते. तर आता राष्ट्रवादीने (शरद पवार) बीड जाळपोळ आणि हिंसाचारातील आरोपीचे फोटो मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदेंसोबत असल्याचे शेअर करत राज्यातील राजकारणात खळबळ उडवून दिली.**

बीडच्या हिंसाचारात हात कुणाचा?

बीड जाळपोळ आणि हिंसाचार प्रकरणातील आरोपी पप्पु शिंदे यांचे फोटो पाहून आता भाजपा नेत्यांनी सांगावे की, बीडच्या हिंसाचारात कुणाचा हात आहे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे का खासदार श्रीकांत शिंदे? असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष युवक अध्यक्ष मेहबूब शेख यांनी केला आहे. ऋषिकेश बेदरे बरोबरचे फोटो ट्विट करून शरद पवार यांचे नाव खराब करण्याचे काम विरोधक करत आहेत. बेदरे हा मराठा आंदोलनातील सक्रीय कार्यकर्ता आहे. बेदरे याच्याविरोधात स्थानिक भाजपा आमदार आहेत. मग बीड जिल्ह्यातील जाळपोळीचा मुख्य सूत्रधार असलेला पप्पू शिंदे याचे फोटो कोणासोबत आहेत, असा सवाल शेख यांनी केला आहे.

पप्पू शिंदे सेनेच्या जिल्हाध्यक्षांचा भाचा

पप्पू शिंदे हा शिवसेनेच्या शिंदे गटाचे बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष यांचा भाचा आहे. त्याचे फोटो एकनाथ शिंदे आणि श्रीकांत शिंदे यांच्यासोबत आहेत. मग आत्ता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर द्यावे, अशी मागणी शेख यांनी केली आहे.

सरकार अंतरावाली दगडफेकीतील गुन्हे मागे घेणार बोलतेय आणि नंतर दोन महिन्यांनी ऋषिकेश बेदरेला अटक करते. बीडच्या जाळपोळीला मुख्यमंत्री जबाबदार आहेत का? असे नितेश राणे आणि राम कदम यांनी ट्विट करावे. भुजबळांनी हा प्रश्न कॅबिनेटच्या बैठकीत उपस्थित करावा आणि सरकारला हा प्रश्न विचारावा, अशी मागणी शेख यांनी केली आहे.

## ज्ञान आणि वैराग्याचा वसा घेतलेले पेठ बीड भागातील संस्थान श्री विठ्ठल मंदिर एकमेव माजीमंत्री क्षीरसागर





बीड । प्रतिनिधी

श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञाला ११ वर्ष पूर्ण झाली असून एकनाथ महाराज यांचे आजोबा वै. भीमबुवा, वडील वै. पांडुरंगबुवा यांच्यासह पुजारी परिवाराचे गुरुघर असलेल्या वैकुंठवासी श्रीसंत धुंडा महाराज देगलूरकर यांच्या संत शिकवणीतून पांडुरंगाची भक्ती, वारकरी सेवा, ज्ञान आणि वैराग्याचा वसा घेतलेले पेठ बीड भागातील संस्थान श्री विठ्ठल मंदिर एकमेव असून येथे वर्षभर अखंड नाम, भक्तीची ज्ञानज्योत तेवत ठेवण्याचे कार्य कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

आज पेठ बीड येथील विठ्ठल मंदिरात श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सांगता समारंभ करण्यात आला यावेळी प्रमुख उपस्थिती श्री आद्य शंकराचार्य विद्यानृसिंह भारती स्वामी महाराज कोल्हापूर, ह भ प गोविंद महाराज जाटदेवळेकर, ॲड कालिदास थिगळे, विलास बडगे, दिनकर कदम, नवनाथ कुलकर्णी, नानासाहेब काकडे, विष्णुदास बियाणी, बालप्रसाद जाजू, बालकिशन सिकची आदींची प्रमुख उपस्थिती. यावेळी बोलताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, भागवताचार्य व संस्थान विठ्ठल मंदिर पेठ बीड या आध्यात्मिक शक्ती पिठाचे मठाधिपती ह. भ. प. एकनाथबुवा पांडुरंगबुवा पुजारी यांच्या अमृतवाणीतून दि. १८ ते २५ नोव्हेंबर २०२३ दरम्यान श्रीमद् भागवतकथा ज्ञानयज्ञ व रुक्मिणी पांडुरंग विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञाला ११ वर्ष पूर्ण झाली असून एकनाथ महाराज यांचे आजोबा वै. भीमब्या, वडील वै. पांडुरंगब्वा यांच्यासह पुजारी परिवाराचे गुरुघर असलेल्या वैकुंठवासी श्रीसंत धुंडा महाराज देगलूरकर यांच्या संत शिकवणीतून पांडुरंगाची भक्ती, वारकरी सेवा, ज्ञान आणी वैराम्याचा वसा घेतलेले पेठ बीड भागातील संस्थान श्री विठ्ठल मंदिर एकमेव असून येथे वर्षभर अखंड नाम, भक्तीची ज्ञानज्योत तेवत ठेवण्याचे कार्य कौतुकास्पद आहे. शुक्रवारी येथे भगवान रुक्मिणी पांडुरंगाचा विवाह सोहळा उत्साहात संपन्न झाला भगवान पांडुरंगाचा विवाह सोहळा पंढरपूर नंतर एकमेव बीड शहरात संपन्न होत आहे ही अभिमानास्पद बाब आहे. स्व काकू-नानांच्या काळापासून आमच्या क्षीरसागर परिवाराचे विठ्ठल मंदिर संस्थानशी अध्यात्मिक नाते जोडले असून ते आजवर कायम आहे. या मदीराच्या सभागृह बांधकाम कामासाठी मला जी पानफुल मदत करणे शक्य झाली हे माझे भाग्य समजतो. असे माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी म्हटले यावेळी परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळातील समाज घटकापर्यंत पीएम विश्वकर्मा योजनेचा लाभ पोहचावा - राजेंद्र मस्के

## विश्वकर्मा योजनेत बीड जिल्ह्याचा समावेश केल्याबद्दल खा. प्रितमताईंचे आभार ..!

भाजपा विश्वकर्मा योजना समितीची बैठक संपन्न..!

बीड (प्रतिनिधी)

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांनी देशातील अठरा पगड जातीतील सूक्ष्म घटकांचा विकास परिपूर्ण झाला पाहिजे. हा उदात्त हेतू समोर ठेऊन, १७ सप्टेंबर २०२३ रोजी पीएम विश्वकर्मा योजनेचा शुभारंभ केला. बीड आणि छत्रपती संभाजीनगर या दोन जिल्ह्याचा समावेश या योजनेत नव्हता. जिल्ह्याच्या खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून जिल्ह्याचा समावेश करून घेतला. याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. सुतार, लोहार, कुंभार, शिल्पकार, धोबी, नाव्ही, चर्मकार, सोनार, मोची, यासारख्या लहान जातीतील व्यावसायिकांना स्वावलंबी करण्यासाठी महत्वकांक्षी योजना सुरु केली. या योजनेचा लाभ अठरा पगड जातीतील प्रत्येक पात्र समाज घटकापर्यंत पोहचावा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

आज संघर्षयोद्धा भाजपा जनसंपर्क कार्यालय बीड येथे भाजपा विश्वकर्मा योजना समितीची बैठक जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या योजनेत बीड जिल्ह्याचा समावेश केल्या बद्दल उपस्थित सर्व समाजाच्या वतीने जिल्ह्याच्या खा. डॉ प्रीतमताई मुंडे यांचे कौतुक करून आभार व्यक्त करणायत आले. प्रधानमंत्री मा. नरेंद्र मोदिजी यांच्या मन कि बात कार्यक्रम करून, २६-११-२००८ मुंबई दहशतवादी हल्यात शहीद झाल्येल्या सैनिकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.



या बैठकीस जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, बीड विस्तारक शांतीनाथ डोरले, विश्वकर्मा समाजाचे जिल्हाध्यक्ष बापूराव भालेकर, गाडी लोहार समाजाचे प्रकाश अणेराव, कुंभार समाजाचे कैलास कुंभार, न्हावी समाजाचे सुनील दोडके, कामगार मोर्चा आघाडीचे दादासाहेब नन्नवरे, पत्रकार नितीन क्षीरसागर, सोनार समाजाचे संकेत बेद्रे, विजय देशमुख, परमेश्वर पांचाळ आदीसह विविध समाजातील प्रमुख मोठ्या संखेने उपस्थित होते.

पुढे बोलताना मस्के म्हणाले की, योजेनेचा लाभ घेण्याची प्रकीया अंत्यंत सुलभ असून, प्रथम सी. एस. सी सेंटरवर जाऊन रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक आहे. ग्रामीण भागातील अथवा निरक्षर व्यावसायिकांना संघनकाचे ज्ञान अपुरे असल्याने, त्यांना लाभ देण्यासाठी भारतीय जनता पार्टी व समाजातील कार्यकर्ते यांनी पुढे होऊन मदत करावी. जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावा. असे आवाहन जिल्हाध्यक्ष मस्के यांनी केले आहे.






# जपान तसेच तैवान आयोजित जागतिक ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये सक्षम सानप आणि आर्यन सानप यांची निवड

बीड (प्रतिनिधी)

बालकांच्या विविध कलागुणांना व्यासपीठ देण्याच्या उद्देशाने, सुप्तगुणांचा विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. अबॅकस आणि वैदिक मॅथ्स सारख्या पद्धतीमुळे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये विद्यार्थ्यांमधील जन्मताच गुणांना संधी निर्माण करून दिली जाते. जागतिक स्तरावरील चेअरमन, इंटरनॅशनल अबॅकस इन्स्टिट्यूट ओसाका जपान, मियाजमा अबॅकस इन्स्टिट्यूट तैवान, तैवान चेंबर्स ऑफ कॉमर्स, ओसाका चेंबर्स ऑफ कॉमर्स, पेन पॅसिफिक अबॅकस पेममा चीन तसेच अबॅकस अकॅडमी आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन तसेच पनामा म्यानमार अबॅकस असोसिएशन , लर्न इंडिया असोसिएशन यांच्या सहकार्याने व समन्वयाने जानेवारी २०२४ जागतिक चॅम्पियनशिपमध्ये सक्षम रत्नदीप सानप आणि आर्यन रत्नदीप सानप यांना अबॅकस चॅम्पियनशिपमध्ये भाग घेण्याची सुवर्णसंधी मिळालेली आहे . सक्षम सानप आणि आर्यन सानप यांनी आत्ताच झालेल्या अबॅकस लेव्हल परीक्षांमध्ये सर्वोत्कृष्ट क्रमांक मिळवल्यामुळे पहिल्या पाच मध्ये सर्वोत्कृष्ट प्रथम क्रमांक मिळविला आहे. अबॅकस जागतिक स्पर्धेमध्ये जपान चीन साऊथ कोरिया तैवान, भारत, श्रीलंका, सौदी अरेबिया, इराण, नॉर्वे, यु एस ए, मोरोक्को, सिंगापूर, मलेशिया, साऊथ आफ्रिका, कॅलिफोर्निया, नेपाळ, अशा एकूण बावीस देशांमधील सात हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना सहभाग नोंदवला असून बक्षीस वितरण कार्यक्रम सुद्धा फेसबूक, ट्विटर, यूट्यूब, झूम अशा सर्व चॅनल्सवर प्रसारित करण्यात येणार आहे . जागतिक अबॅकस चॅम्पियनशिप मध्ये आर्यन सानप आणि सक्षम सानप दोघांना बीडच्या सुपर जिनियस अबॅकस विद्यार्थी म्हणून सहभाग घेऊन नक्कीच उत्कृष्ट विजयी पदक मिळतील. अबॅकस लेव्हलच्या परीक्षामध्ये



देशस्तरावरील अतिशय प्रतिष्ठित समजले जाणारी अबॅकस प्रवेश परीक्षामध्ये सुद्धा त्यांना सर्वोत्कृष्ट रँकर्स म्हणतात कारण सक्षम सानप आणि आर्यन सानपने अतिशय कठीण गणितीय प्रश्न सोडविण्याचा ऐतिहासिक विक्रम केलेला आहे. आई-वडिलांच्या आणि शिक्षकांच्या सततच्या मार्गदर्शनामुळे यश प्राप्त करता आलेले आहे असे सांगितले आहे. आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशनचे आयोजकने सक्षम आणि आर्यनने मिळवलेल्या यशाचे अभिनंदन केले आहे. अबॅकस स्टडी सेंटरचे प्रमुख डॉ. घोडके एस ए. अभिनंदन केले असून उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत. समाजातील सर्व स्तरांमधून सक्षम सानप आणि आर्यन सानपचे अभिनंदन होत असून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. जागतिक स्तरावरील अबॅकस चॅम्पियनशिपसाठी समाजातील सर्व नातेवाईकांनी मित्रांनी त्यांना हार्दिक शुभेच्छा दिलेल्या आहेत असे जिल्हा अबॅकस वितरक एस. ए. घोडके यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या उपजत गुणांचा विकास करण्यासाठी अबॅकस पध्दत फार उपयुक्त असून शालेय स्तरातील अभ्यासाला मुळातून मदत करण्याची, विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताबद्दलची भीती दूर करण्यासाठी अबॅकस उपयुक्त आहे असे अबॅकस मास्टर ट्रेनर एस. ए. घोडके यांनी सांगितले.




# युसूफ वडगाव पोलिस स्टेशनच्या विरोधात आगळं वेगळं उपोषण

वा .....असं पण आंदोलन असत

हे आहेत लहू बनसोडे रा पाथरा ता केज यांची सोयाबीनची गंज अज्ञात व्यक्तीने जाळून नुकसान केले युसुफ वडगाव पोलिसात फिर्याद दिली ,पोलीस तपास करत नाहीत संशयित आरोपीची नावे दिल्याचे बनसोडे यांचे म्हणणे आहे ,उपोषण सोडवायचे कसे ही कसरत आहेच हा पठया चक्क शाळेच्या खिडकीवर उपोषणाला बसला पोलीस देखील आहेत पण ते काय करणार

# लोणगाव ग्रामपंचायतीमध्ये संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा

आज लोणगाव ग्रामपंचायत मध्ये संविधान दिन साजरा करण्यासाठी येथे २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाच्या संविधान सभेने राज्यघटना स्वीकारली. हा तो दिवस आहे जेव्हा संविधान तयार झाले. २६ नोव्हेंबर संविधान दिन हा प्रत्येक भारतीय नागरिकासाठी अभिमानाचा दिवस आहे. कोणताही देश संविधानाशिवाय चालू शकत नाही. भारतातील विविध धर्म आणि जातींच्या १४० कोटी लोकसंख्येला एक देश म्हणून एकत्रित करणारी ही राज्यघटना आहे. राज्यघटनेतच देशाची तत्त्वे आणि ती चालवण्याच्या पद्धती आहेत.संविधानामुळेच आपण स्वतंत्र देशाचे स्वतंत्र नागरिक आहोत.राज्यघटनेने दिलेले मुलभूत अधिकार हे आपली ढाल म्हणून काम करून आपल्याला हक्क बहाल करत असले. तर, त्यात दिलेली मुलभूत कर्तव्ये आपल्याला आपल्या जबाबदाऱ्यांची आठवण करून देतात.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा आपल्याकडे स्वत:चे कोणतेही संविधान नव्हते. संविधानाशिवाय देश चालवता येत नाही, म्हणून संविधान सभेची स्थापना करण्यात आली.पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार




वल्लभभाई पटेल, श्यामा प्रसाद मुखर्जी, मौलाना अबुल कलाम आझाद हे नेते या बैठकीचे प्रमुख सदस्य होते. तर, डॉ. भीमराव आंबेडकर हे राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते, म्हणून त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार असेही म्हटले जाते.

संविधान तयार करण्यासाठी २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस लागले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी पूर्ण होऊन त्याचा स्वीकार करण्यात आला. यानंतर, १ वर्षानी म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना लागू करण्यात आली असे सविस्तर मार्गदर्शन लव्हळे सर व व्यंकटेश सोनकांबळे यांनी केले यावेळी लोणगाव चे नवनिर्वाचित सरपंच नारायण राऊत यांना संविधानाची प्रत भेट म्हणून देण्यात आली विस्तार अधिकारी राजेंद्र थावरे ग्रामविकास अधिकारी पवार आन्साराम आलाट शरद पवार संजय पवार दादाभाऊ मुंडे सुदाम आलाट नितीन सोनकांबळे बालासाहेब रसवे व्यंकटराव कोळसे गणेश महाराज कोळसे दत्ता भागवत माणिक दादा कुलकर्णी गजानन कोळसे बालासाहेब पवार संजय कुलकर्णी दत्तू राऊत साहेबराव राठोड बाळासाहेब सोनवलकर नजर सय्यद गौतम सोनकांबळे अनिकेत आलाट प्रकाश सोनकांबळे यांनी आभार मानले व यांच्या सह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या अंबाजोगाई तालुक्यातील तरुणाच्या कुटुंबियास शासनाची १० लाखांची मदत

परळी (प्रतिनिधी)

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीतून आत्महत्या केलेल्या अंबाजोगाई तालुक्यातील गिरवली (बा) येथील तरुणाच्या कुटुंबाला राज्य शासनाच्या वतीने १० लाखांची मदत पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून मंजूर करण्यात आली असून, आज या रकमेच्या धनादेशाचे संबंधित कुटुंबास धनंजय मुंडे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

अंबाजोगाई तालुक्यातील गिरवली गावच्या शत्रुघ्न काशीद या मराठा तरुणाने आरक्षणाच्या मागणीतून आत्महत्या केली होती. त्यानंतर पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी वैयक्तिक पातळीवर देखील काशीद कुटुंबास आर्थिक मदत केली होती; तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून काशीद कुटुंबाला आर्थिक मदत मिळण्यासाठी प्रयत्न केले.

आज काशीद कुटुंबाला मयत शत्रुघ्न काशीद यांच्या पत्नी सुलोचनाताई यांच्या कडे १० लाख



**पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते धनादेशाचे कुटुंबियांना वितरण**

रुपये मदतीचा धनादेश श्री.मुंडे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, बबन भैय्या लोमटे, ॲड.अशोक कवडे, अंबाजोगाईचे तहसीलदार विलास तरंगे आदी उपस्थित होते.

### बीड जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तात्काळ दिलासा द्यावा :- विकास गायकवाड

बीड जिल्ह्यातील जनावरांचा .चाऱ्यांचा व पाण्याचा प्रश्न बिकट झाला .आहे त्यासाठी शासनाने तात्काळ जनावरांच्या छावण्या सुरू करून व पाण्याची सोय करावी अशी मागणी . रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) .चे बीड जिल्हा अध्यक्ष .विकास गायकवाड. यांनी केली आहे . गावोगावी पिण्याचा पाण्याचा प्रश्न बिकट झाला आहे ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध नाही



त्या ठिकाणी तात्काळ टँकर सुरू करण्यात यावे दुष्काळ जाहीर होऊन एक आठवडा झाला तरीही शासनाने कुठल्याही प्रकारची ठोस कारवाई केली नाही त्यामुळे लवकरात लवकर शहरी व ग्रामीण भागात पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्यांची व्यवस्था करण्यात यावी व सर्व शेतकऱ्यांना ७५ टक्के ग्रीम पिक विमा देण्यात यावा नसता सर्व शेतकरी बांधवांना सोबत घेऊन जिल्हा त मोठं आंदोलन छेडण्याचा इशारा बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# कलेतील सारे प्रवाह महाराष्ट्राने स्वीकारले-माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर

### दीपमाळेवर संस्कार भारतीचा नेत्रदीपक दीपोत्सव

बीड (प्रतिनिधी)

देशातील विविध कला महाराष्ट्राने स्वीकारून आपले कलाक्षेत्रही विस्तारले ,रसिकांनीही या स्वतंत्र वैशिष्ट्य असणाऱ्या कलांना जनाश्रय दिला असे मत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.येथील खंडोबा मंदिर दीपमाळेच्या परिसरात संस्कार भारती बीडचा दीपोत्सव संपन्न झाला, यावेळी विविध गायन वादन स्पर्धेत बक्षिसे जिंकलेल्या कलावंतांची सुरेख मैफल संपन्न झाली.

प्रतिवर्षी प्रमाणे त्रिपुरारी पोर्णिमेनिमित्त संस्कार भारती बीडच्या वतीने येथील ऐतिहासिक दीपमाळ परिसर हजारो पणत्या,आकर्षक रंगानी आणि ताल सुरात नाहून निघाला.याप्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते संगीत शिक्षक आणि विविध स्पर्धात बक्षीस मिळवलेल्या कलावंताचा स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला,याच कलावंतानी नंतर दोन तास विविध गाणी गाऊन मैफल संपन्न केली,ऐकल तबला वादन ,बासरी वादन आणि भरतनाट्यम शैलीतील नृत्य या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य ठरले.कार्यक्रमास माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते,व्यासपीठावर संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांताचे अध्यक्ष भरत लोळगे,प्रांत प्रचार प्रमुख महेश वाघमारे, संस्कार भारती बीडचे अध्यक्ष प्रमोद वझे हे उपस्थित होते. यावेळी जयदत्त क्षीरसागर यांनी कलावंत आणि संगीत शिक्षकांचे कौतुक केले,भारतीय संस्कृतीत कला क्षेत्राचे विशेष योगदान असून महाराष्ट्राने उत्तर भारत,दक्षिण भारतातील कला प्रकारही आपली



पारंपरिक कला,लोककला जपत आत्मसात केल्याचे ते म्हणाले,विविध नामवंत कालावंतांचाही उल्लेख करीत त्यांनी गौरव केला, नव्या माध्यमांनीही कला आणि कलावंताना प्रोत्साहन मिळाले असे निरीक्षणही क्षीरसागर यांनी नोंदवले, धकाधकीच्या जीवनात संगीत,नाटक,चित्रपट हेच विरंगुळा देऊ शकतात असे सांगत बीड संस्कार भारतीच्या कनकालेश्वर महोत्सवाचा त्यांनी विशेष उल्लेख केला. प्रास्तविक प्रमोद वझे यांनी केले,त्यांनी संस्कार भारतीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली,कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन गणेश तालखेडकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.राहुल पांडव यांनी केले.यावेळी कु.सुरभी निराळे,स्वराली साळुंके,देवकी साळुंके,देव मुळे, राधेश्याम चिरके अर्णव कोळेकर, अर्णव खडकीकर, श्रध्दा ठोसर, श्रावणी जोशी ओंकार देशपांडे (बासरी),अद्वय पोपळे, ओंकार कुलकर्णी, वेदांत देशमुख, पल्लवी पंडीत,पुनम धुताडमल रश्मी थिगळे, वैष्णवी सर्वज्ञ(भरत नाट्म) यांनी कला सादर केली.त्यांना संवादीनीवर नामदेव साळुंके,सुदर्शन धुतेकर, महेश कुलकर्णी,सचिन मार्गे यांनी तर तबल्यावर प्रकाश मानुरकर,बालाजी मानगिरे, योगीराज वाघमारे यांनी साथ संगत केली.दीपमाळ प्रांगणात संस्कार भारतीची भव्यदिव्य रांगोळी काढून त्यावर हजारो दिव्यांची आरास करण्यात आली. दीपोत्सव यशस्वी करण्यासाठी महेश देशमुख, अशोक कुलकर्णी,दत्ता घोडके,अनिल कुलकर्णी, जगदीश जाधव, प्रशांत सुलाखे,गुरु कुलकर्णी,डॉ.रविंद्र शिवणीकर,सतिश सुलाखे यांनी परिश्रम घेतले.

# गोदावरी पात्राच्या काठावर रंग बदलणारा सरडा

टाकरवण :-( राम आडागळे ) टाकरवण पासुन जवळच आसलेल्या गोदावरी पात्राच्या काठावर रंग बदलणारा सरडा शॅमेलियन आढळून आला. सदर शॅमेलियन वन्यजीव छायाचित्रकार अशोक खुळे यांना गोदावरीच्या काठावर फिरतांना आढळला. हा सरड्याच्या प्रजातीचा असून, तो वेळेनुसार आणि संकटसमयी आपला रंग बदलत असतो.

या सरड्याला रंग बदलणारा गिरगिट असे म्हणूनही ओळखला जातो. हा सॅमेलियन झाडावर राहतो, तर कधी - कधी तो आपल्या भक्ष्याच्या शोधार्थ रस्त्यांवर आढळून येतो. या सरड्याची शेपटी लांब असते, त्यामुळे तो झाडाच्या फांदीला शेपटी गुंडाळून झोकेसुद्धा घेतो. इतर चपळ सरड्यांच्या तुलनेत अतिशय संथ असल्यामुळे सहज मारला जाणारा शॅमेलियन दुर्मिळ झालेला आहे. या सरड्याला लाभलेली निसर्गदत्त देणगी म्हणजे झाडे आणि



पाने, गवताच्या रंगानुरुप तो रंग बदलू शकतो. त्याचे कारण म्हणजे नैसर्गिक रंगात मिसळून गेल्याने शत्रूपासून संरक्षण करता येते. त्वचेखाली असलेल्या रंगद्रव्यांमुळे तो रंग बदलू शकतो. तथापि, त्याचा मूळ रंग हिरवा आहे. ग्रामीण भागातील लोक त्यास घुमा असे म्हणतात. शॅमेलियन दुर्मिळ असल्याने त्याची जपवणूक करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.या सरड्यास धावता येत नाही. त्यामुळे स्वत:चा बचाव करण्यासाठी तो आजूबाजूच्या परिसरानुसार रंग बदलत असतो. जर ते शक्य होत नसेल आणि शत्रु जवळच आला तर हा सरडा स्वत:च अंग आणि गळा फुगवुन आपण भयानक असल्याचा भासवतो. त्याला दात असतात. त्यामुळे घोयरा चावल्यास लहानशी जखम होते. मात्र हा शेतकऱ्यांचा मित्र आहे. शेतातील किटके खातो. यामुळे त्यांच्यापासून कोणतीही हानी नाही. - अशोक खुळे, छायाचित्रकार

टाकरवण - गोदावरी नदीच्या काठावर आढळलेला दुर्मीळ शॅमेलियन सरडा

# पुरोगामी पत्रकार संघाची रायगड जिल्ह्याची बैठक मोठ्या उत्साहात संपन्न

पनवेल (प्रतिनिधी)

राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाची रायगड जिल्हा बैठक दिनांक २६ नोव्हेंबर २०२३ संध्याकाळी चार वाजता रायगड जिल्हा संपर्क कार्यालय नवीन पनवेल येथे मोठ्या उत्साहात बैठक पार पडली. आज २६ नोव्हेंबर संविधान दिनाच्या औचित्य साधून आजची रायगड जिल्हा बैठक घेण्यात आली या बैठकीच्या सुरुवातीला भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन प्रसाद निकुंभ यांनी केले. बैठक संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी राष्ट्रीय सचिव प्रविण परमार यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली.बैठकीच्या सुरुवातीला उपस्थित पदाधिकाऱ्यांनी आपला परिचय दिला



तसेच संघाचे रायगड जिल्हा अध्यक्ष राजू वारुंसे यांनी संघाची आत्तापर्यंत केलेली पत्रकार व समाज उपयोगी कामे केल्याचे यावेळेस सांगितले तसेच ज्येष्ठ पत्रकार किरण बाथम यांनी पत्रकार संघाविषयी विषय सविस्तर माहिती सांगितले व संघातील पदाधिकारी पैकी ओवळे ग्रामपंचायत सदस्य निवडून आल्याबद्दल राज सदावर्ते यांचे सर्वांनी अभिनंदन केले.उपस्थित पदाधिकाऱ्यांना मोलाचा मार्गदर्शन संघाचे संस्थापक अध्यक्ष विजय सूर्यवंशी यांनी केले.

# धीरजकुमार बच्चू यांनी तपासले माजलगाव शहरातील डार्क स्पॉट !

### डार्क स्पॉट वर सापडलेल्या मोकाट मद्यपीवर कारवाई

माजलगाव (प्रतिनिधी)

असून हेच डार्क स्पॉट आहेत. या ठिकाणी त्यांनी सहाय्यक पोलीस अधीक्षक धीरजकुमार बच्चू यांनी थांबू नये यासाठी माजलगावचे सहाय्यक पोलीस माजलगाव शहरातील डार्क स्पॉट तपासणी मोहीम अधीक्षक धीरजकुमार बच्चू यांनी काही हाती घेतली असून काल रात्री ची सुमारास त्यांचे सह उपाययोजना शहर पोलिसांना सुचवलेले आहेत. सोबत पोलीस निरीक्षक शीतलकुमार यामधील त्या ठिकाणी लाईट लावणे, येण्या बल्लाळ, पोलीस जमादार गणेश तळेकर, अशोक जाण्याची रस्ते बंद करणे, नागरिकांच्या



संपर्कात मिसाळ, राजू कोकाटे या पथकास मंगलनाथ राहून माहिती मिळवणे आणि तेथे नियमित गस्त मैदानावर चोरून लपून बिना परवाना दारू पीत ठेवणे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून त्यांनी शहर असताना सहा मद्यपी सापडले. अशा सहा मद्यपींवर पोलिसांचा स्टाफ सोबत घेऊन काल सर्व असे अड्डे ज्यांची नावे अहमद गुलाब शेख, शिवाहरी भीमराव यांना भेटी दिल्या होत्या आणि तेथील थांबलेल्या घुगे, दोघे राहणार माजलगाव, सुमंत लिंबाजी लोकांवर जागेवरच त्यांच्या पद्धतीने कारवाई केली. कोथिंबीरे, रा. कोथिं बीर वाडी, हरिभाऊ महादेव त्याचप्रमाणे वर उल्लेख केल्याप्रमाणे सहा व्यक्तीवर शिंदे, रा. मालीपारगाव, विठ्ठल जगन्नाथ चव्हाण कारवाई करण्यात आली आहे. यापुढेही अशीच गस्त रा. नवगण राजुरी आणि एक अज्ञात यांच्यावर मुंबई चालू ठेवून अशा ठिकाणचे बदमाश लोकांचे थांबणे दारूबंदी कायदा कलम ६५ ई. नुसार गुन्हा दाखल प्रतिबंधित करण्यात येणार आहे ती कारवाई करण्यात आला आहे, तसेच पोलीस खाक्या दाखऊन केल्यानंतर येथील सामान्य लोकांनी समाधान व्यक्त कारवाई केली आहे. ज्या ठिकाणी मोडकळीस केले आहे आणि पोलिसांच्या नियमित गस्तची आलेली घरे, बेवारस घरे, बेवारस सरकारी कार्यालये मागणी केली आहे. आणि अंधाराच्या जागा या गुन्हेगारांचे ठिकाणे बनले.

# अखेर २२ हजार कुटुंबे होणार बेरोजगार जायकवाडी सौर ऊर्जा प्रकल्पामुळे मच्छीमार बांधव संकटात

## पर्यावरण संरक्षण कायदा पायदळी तुडवून सरकारने प्रकल्पास दिली मंजुरी

शेवगाव (प्रशांत बाफना)

छत्रपती संभाजीनगर व नगर जिल्ह्यातील २२ हजार मच्छीमार कुटुंबांना बेरोजगार करणाऱ्या तसेच जायकवाडी जलाशयातील जैविक साखळी अन जैवविविधतेवर घाला घालणाऱ्या नाथसागर जलाशयावरील नियोजित तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्पाला अखेर सरकारने मंजुरी दिली असून हा प्रकल्प नाथसागराचा बट्ट्याबोळ करणारा सिद्ध होणार असल्याचे चित्र समोर येत आहे. प्रकल्पाला प्रचंड विरोध असल्याने केंद्र व राज्य शासनाने अत्यंत गोपनीयता पाळत नियमक मंडळाच्या माध्यमातून १५ एकरवर पोलिंग स्टेशन उभारण्यास केंद्र सरकारच्या अंगीकृत असलेल्या नॅशनल थर्मल पावर कॉर्पोरेशन लिमिटेड (छढझउ) कंपनीस मान्यता दिली आहे. कंपनीकडून प्रतिवर्षी ५६ लाख ८४ हजार रुपयांचा जमीन भाडेपट्टा वसूल करणार असून टप्प्याटप्प्याने दोन हजार एकरच्या पानपसाऱ्यावर हा प्रकल्प उभा राहणार आहे.जायकवाडी जलाशयात तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प झाल्यास पाण्यावर बसवल्या जाणाऱ्या प्लेट्स व इतर साहित्य यामुळे सूर्यप्रकाश पाण्यात पडणार नाही परिणामी प्रकल्पाच्या आच्छादनामुळे प्रदूषण तयार होऊन पाण्यातील जलचारास ऑक्सिजन मिळणार नाही परिणामी पाण्यातील जलचर नष्ट होतील.पाणी दूषित होऊन सडण्यास सुरुवात होईल व नागरिकांना तसेच शेतात पिकांना स्वच्छ पाणी न मिळाल्याने मानवी शरीर तसेच पिकांवर त्याचा दुष्परिणाम होईल. पाण्यातील वनसंपदेवर दुष्परिणाम होऊन वनसंपदा नष्ट होईल.जायकवाडी जलाशय पक्षी अभयारण्य म्हणून घोषित आहे. पाण्यावर सौर ऊर्जा प्रकल्प झाल्यास भविष्यात पाण्याचा मृत साठा शिल्लक राहिल्यास पक्षांना पाण्यावर उतरता येणार नाही परिणामी पक्षी जलाशय सोडून जातील.सौर ऊर्जा प्रकल्पामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे जलचर प्राणी तसेच वनस्पती, पक्षी यांच्या जीवनसाखळीवर परिणाम होऊन त्यांचे जीवन नष्ट होईल.पाण्यात ऑक्सिजन लेवल कमी होऊन पाणी खराब होईल व या पाण्याचे सेवन केल्याने आसपासच्या गावात



रोगराई पसरण्याची भीतीही नाकारता येणार नाही.अशी माहिती पर्यावरण संरक्षण संस्थांनी दिली आहे.सौर ऊर्जा प्रकल्प झाल्यास मच्छीमार बांधवांना मासेमारी करता येणार नाही परिणामी जलाशयाच्या जीवावर जीवन जगणारे २२ हजार कुटुंबांना रस्त्यावर येण्याची वेळ येईल. सरकारवर कायदे लागू नाहीत का ?जायकवाडी जलाशय इको सेन्सिटिव्ह झोन असल्याने या ठिकाणी अशा प्रकारचे प्रकल्प उभरता येत नाहीत हे माहित असून देखील सरकारने हा प्रकल्प उभारण्याचा घाट घातला असल्याचे समोर येत आहे.पर्यावरण संरक्षण कायदा सरकारने पायदळी तूडउन अगदी सोप्यापणे या प्रकल्पाला मंजुरी दिली आहे. सामान्य नागरिकांनी पर्यावरण संरक्षण कायद्याचे उल्लंघन केल्यास त्याला शिक्षेस पात्र ठरवले जाते मग जर सरकारनेच पर्यावरण संरक्षण कायद्याचे उल्लंघन केल्यास ते योग्य समजले जाईल का ? सरकारवर कायदे लागू होत नाहीत का ? असाही प्रश्न उपस्थित होतोय.मग ही मनगटशाही नाही तर काय ?इको सेन्सिटिव्ह झोन असताना मंजुरी मिळाली कशी ?

**गेल्या काही महिन्यांपासून या प्रकल्पाला मोठ्या प्रमाणावर मच्छीमार बांधव विरोध करत आला आहे. मच्छीमार बांधवांनी वेगवेगळ्या पद्धतीने सरकार समोर आपले प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला परंतु सरकारने यावर कोणत्याही प्रकारचा ठोस निर्णय घेतलेला दिसून येत नाही यामुळे मच्छीमार बांधव लवकरच संपूर्ण महाराष्ट्रभर आंदोलन,उपोषणाच्या माध्यमातून लढा उभारणार असल्याचे समोर येत आहे.**

जायकवाडी जलाशय हे पक्षी अभयारण्य असून इको सेन्सिटिव्ह झोन म्हणून घोषित झालेले आहे अशा ठिकाणी अशा प्रकारचे प्रकल्प उभारता येत नाहीत. अशा प्रकारचे प्रकल्प झाल्यास पर्यावरणाचा ऱ्हास होऊन त्याचे दुष्परिणाम पशु पक्षांवर तसेच जैवविविधतेवर होतील याची पूर्वकल्पना असताना देखील या प्रकल्पाला मंजुरी मिळाली कशी ? या विषयावर अद्याप पर्यंत प्रधान मुख्य वन्यजीव संरक्षक गप्प का असा प्रश्न निर्माण होत आहे.वनविभागाने अद्याप पर्यंत साधली चुप्पीपर्यावरण संरक्षण, वन्यजीव संरक्षण तसेच पर्यावरण संरक्षण करणे वनविभागाचे कर्तव्य आहे. या प्रकल्पामुळे पर्यावरणावर तसेच जैवविविधतेवर धोका उद्धवणार असल्याचे माहित असून देखील वन विभाग अद्याप पर्यंत शांत का ? असा प्रश्न देखील उपस्थित होत आहे.ताजा कलम मच्छीमार बांधव लवकरच उभारणार प्रकल्पाविरोधात लढा

---

## देवगाव येथील शेतकरी पांडुरंग सुरवसे यांची दोन एकर ज्वारी भुईसपाट



वडवणी ।अंकुश गवळी

बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढवलीय. मध्यरात्री झालेल्या पावसाने खरीपातील कापूस आणि तूर या पिकांचे नुकसान झाले आहे. वडवणी तालुक्यातील देवगाव या ठिकाणी शेतकरी पांडुरंग सुरवसे यांच्या शेतातील दोन एकर ज्वारीचे पीक वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाने भुई सपाट झाले आहे. यासह कांदा हरभरा पिकाचे देखील नुकसान झालंय. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्याप दुष्काळी मदत मिळालेली नाही. असं असताना आता अवकाळीचे संकट शेतकऱ्यांसमोर उभ ठाकले आहे. अशातच आता जिल्ह्यातील शेतकऱ्यांची मदार शासनाच्या मदतीकडे आहे.

**अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढली; कापूस, तूर, हरभरा, कांदा पिकाचे नुकसान**

---



## संविधान सर्व भारतीय साठी- वरदान आहे प्रा-बबीता गायकवाड

वाचाल तर वाचाल तर्फे संविधान दिन विविध उपक्रम घेऊन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी)

भारतीय संविधानाची प्रास्ताविका हे घटना सारा आहे.त्यानुसार संविधान कटे कोरपणे अमाल बजावणी म्हणजे प्रत्येक भारतीय नागरिकास स्वतंत्रता,समता, बंधुता व न्यायाची शाश्वती होय, म्हणून भारतीय संविधान सर्व यांसाठी वरदान आहे प्रतिपादन प्रा. बबीता गायकवाड यांनी सविधान दिनी केले.महामानव मोफत शिकवणी वर्ग प्रकाश अंबेडकर नगर बीड येथे वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचणाऱ्या तर्फे आयोजित संविधान दिन कार्यक्रम प्रसंगी सेवानिवृत शिक्षक अधिकारी सखाराम उजगरे लाभले होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बबीता गायकवाड. सेवानिवृत्त पीएसआय तानाजी शिंगारे व प्राचार्य सुशील कुमार गायकवाड यांची प्रमुख उपस्थिति होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डि.जी. वानखेडे यांनी केले. तर सूत्रसंचालन जीएम भोले यांनी केले. सर्वप्रथम तथागतांच्या प्रतिमेस तर घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस हस्ते पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले.व संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामुदायिक वाचन करण्यात आले. विद्यार्थी व पालकांशी हितगुज साधताना प्रश्न उत्तराच्या रूपात प्रास्ताविकाच्या साराबद्दल प्रा. गायकवाड यांनी सविस्तर माहिती दिली.कार्यक्रम प्रसंगी अनन्या वाघमारे भूमिका चौगुले,अमृता चौगुले, आदित्य डोंगरे ह्या विद्यार्थीनी सुरेल आवाजात घटनेबद्दल गित्तगाऊन, सरवाना मंत्रमुग्ध केले.वाचाल तर वाचाल वाचनालयातील विद्यार्थी जास्तीत जास्त पुस्तके वाचणारा विद्यार्थी आदित्य डोंगरे याला राष्ट्रीचे निर्माते महात्मा ज्योतिबा, सावित्रीबाई फुले, पेरियार रामास्वामी ,डॉ. पंजाबराव देशमुख, संत गाडगे बाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र व जीवन कार्य पुस्तक के देऊन सत्कार करण्यात आला व प्रकाश अंबेडकर नगर परिसरातील विद्यार्थी व पालका करीता सहाव्या फेरीतीलतिल पन्नास पुस्तक का संच वचाऱ्याकरता शिक्षाका विशाखा वाघमारे यांना मान्यवरांच्या हस्ते सुपूर्त करण्यात आला. पन्नास विद्यार्थ्यांना वाचनालया तर्फे शालेय साहित्य वही पेन व प्रस्तावित प्रतिचे करण्यात आले. तर प्राचार्य सुशील गायकवाड यानी आपल्या वडिलांच्या स्मृती तीर्थ ५० विद्यार्थ्यांना इंग्रजी चांगल्या प्रकारे अवगत व्हावे म्हणून इंग्रजी ग्रामर ची पुस्तके त्वरित केली.

संविधान दिनी तानाजी सिंगारे यांनी स्पष्ट केले की कोणतीही सरकारी नोकरी करताना घटनेनुसार आपले कर्तव्य बजावल्यास जीवनात यशस्वी होता येते. घटना समजुन घेणे प्रतेकाचे कर्तव्य आहे. प्रा अर्जुन जंजाळ यानी श्रीलंका धाम यात्रीतील प्रसंग सांगुन स्वतंत्रता, समता, बंधुता, प्रज्ञा, शिल, करुणा व मैत्री या आधारित आपल्या घटानेचे महत्व सांगीतले, श्रीलंका धाम यात्रा संपन्न केल्या बद्दल मोफत शिकवणी वर्गातर्फे जि.एम.भेले,व प्रा. अर्जुन जंजाळ ता येथे सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय समारोपात शिक्षण व वाचनाची गोडी संविधानाचे महत्त्व माननीय सखाराम उजगरे यांनी समजावून सांगितले.

---

## चौसाळा महावितरणचा भोगंळ कारभार थांबवा अन्यथा अधिकारयाच्या तोडांला काळे फासणार-विवेक कुचेकर

# चौसाळा परिसरात अपघाताला निमंत्रण



सर्वच रोहित्रांच्या पेट्या उघड्या, वेलींसह झाडा-झुडपांचा वेढा

चौसाळा (प्रतिनिधी)

चौसाळा महावितरण कार्यालयाअंतर्गत चौसाळा, हिंगणी (बु), हिंगणी (खुर्द), जेबापिंप्री, पालसिंगण, चांदेगाव, देवीबाभूळगाव, अंजनवती, घारगाव, माळेवाडी, रुईगव्हन, पिंपळगाव, वाढवणा, मानेवाडी, सुलतानपूर, कानडी, गोलंग्री, लोणी घाट आदी सर्वच गावांतील डीपी (रोहित्र) पेट्या गेल्या अनेक वर्षांपासून उघड्या असून, याकडे महावितरणचे सर्रासपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी केला आहे.

अनेक रोहित्रांच्या (डीपी) बॉक्सची झाकणे तुटलेली आहेत, त्यातील बाहेर डोकावणारे वायरिंग, लोंबणाऱ्या वायरी, कित्येक डीपींची झाकणेही उघडीच, काही डीपी तर विजेच्या खांबावरून निखळून खाली जमिनीलगतच आलेल्या आहे. विशेष म्हणजे शेतीसाठी वापर असणाऱ्या या रोहित्रांच्या मेंटेनन्सचा म्हणजेच फ्यूज, रोहित्रातील तेल, त्याचे झाकण आदींचा आर्थिक खर्च शेतकरी वर्गणी करून करत आहेत. तसेच अनेक गावांतील लोंबकळणाऱ्या तारा ह्या जीवघेण्या ठरत आहेत. या तारांचे घर्षण होऊन अनेक ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या आहेत. किमान आता तरी जनतेच्या सहनशीलतेचा अंत न पाहता वरील सर्व बाबींची दखल घ्यावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे असुन

रोहित्रांच्या उघड्या असलेल्या पेट्यांमुळे यापूर्वीही अनेकांचे जीव गेलेले आहेत. आणखी किती जीव जाण्याची वाट महावितरण बघत आहे? महावितरण कार्यालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ दखल घेऊन दुरुस्तीच्या कामास सुरवात करावी अन्यथा महावितरणच्या अधिकारयाच्या तोडांला काळे फासण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते विवेक कुचेकर यांनी दिला आहे.

---

# भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष व प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे यांच्यावरील खोटा गुन्हा मागे घ्या

## शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांना भाजपा, विविध पक्ष तसेच सामाजिक कार्यकर्त्यांचें निवेदन !

शेवगाव (प्रशांत बाफना)

अहमदनगर भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष व महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे व त्यांचे बंधू उदय मुंढे यांच्यावर भादवि कलम ३७९/३४ अन्वये शेवगाव पोलीस ठाण्यात शुक्रवार दि २४ रोजी गुन्हे दाखल करण्यात आले. हे वाळू चे खोटे गुन्हे तत्काळ मागे घ्या तसेच ही खोटी पोलीस केस दाखल करणाऱ्या अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करा ! या मागणीसाठी आज शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या कार्यालयावर भाजपा पदाधिकारी व अन्य पक्षांच्या पदाधिकार्यांनी एकत्र येऊन शेवगाव पोलीस उपविभागीय अधिकारी सुनील पाटील यांना निवेदन दिले.

खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या अधिकाऱ्यावर तात्काळ बदलीची करण्यात यावी व त्यांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी यावेळी निवेदनकर्त्यांनी पाटील यांच्याकडे केली. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष गोकुळ भाऊ दौंड, पाथर्डी चे माजी सभापती संभाजीराव पालवे, पाथर्डी चे भाजपा तालुकाध्यक्ष माणिक खेडकर, धनंजय बडे, अमोल सागडे, संजय कीर्तने, गुरुनाथ माळवदे बाळासाहेब कोळगे, संजू मरकड, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कौशल सदस्य संजय नांगरे, राष्ट्रपती शेवगाव तालुका अध्यक्ष आत्माराम कुंडकर, आर पी आय चे अध्यक्ष सतीश मगर, डॉ कृष्णा कुमार देहाडराय, डॉ नीरज लांडे, विनोद मोहिते, संजय टाकळकर, बाळासाहेब आव्हाड, अशोक गाडे, संजय खेडकर, गणेश कराड, अर्जुन ढाकणे, वजीर पठाण, युसुफ शेख, अजय भारस्कर, भूषण देशमुख, राहुल भारस्कर, अॅड श्याम कनगरे,




**कारवाई झाली नाही तर आठ दिवसात आंदोलनाचा इशारा !**

लाडजळगाव चे अंबादास ढाकणे, युवराज फुंदे, अमोल फुंदे, पप्पू केदार, सर्जेराव जवरे, अशोक जवरे, अण्णासाहेब ढोक, शिवाजी दहिफळे, मल्हारी घुले, माऊली उगले, रवि राशिनकर, अभिजीत घोळवे, तुकाराम थोरवे, तसेच शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील भाजपाचे कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

**शेवगाव पोलीस निरीक्षकाच्या विरोधात घोषणाबाजी**

शेवगाव उपविभागीय पोलीस अधिकारी त्यांच्या कार्यालयाला निवेदन देते वेळी कार्यकर्त्यांनी शेवगाव पोलीस निरीक्षक यांच्या विरोधात घोषणाबाजी केली तसेच त्यांची चौकशी व्हावी अशी मागणी केली.

**पोलीस तक्रार व बांधकाम विभाग यांच्या पंचनाम्यात मतभिन्नता !**

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, २३ ऑगस्ट २०२३ रोजी व २४ ऑगस्ट २०२३ रोजीच्या दरम्यान वाळू चोरी गेल्या बाबत नमूद केले आहे व सार्वजनिक बांधकाम विभागाने दि २९ ऑगस्ट २०२३ रोजी प्रत्यक्षात पंचनामा केला असता वाळूचा साठा जशास तसा आहे हे स्पष्ट होते. यावरून सदरची तक्रार ही खोटी व राजकीय नेतृत्वाच्या संगत मताने केलेली आहे हे स्पष्ट होते. असे निवेदनात म्हटले आहे.

**खोटी पोलीस केस दाखल करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई न झाल्यास रास्ता रोको चा इशारा !**

शेवगाव पोलीस निरीक्षक यांच्यावर आठ दिवसाच्या आत कारवाई झाली नाही तर रस्ता रोको व उपोषणाचा इशारा आजच्या निवेदनात देण्यात आला आहे.

# सचिन धसची अंडर १९ भारतीय संघात निवड

## बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनने केले अभिनंदन

प्रतिनिधी। बीड

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा फलंदाज सचिन धसची आशिया करंडकसाठी अंडर-१९ या भारतीय संघात निवड झाली आहे. या स्पर्धेची सुरुवात ८ डिसेंबरपासून युएई येथे होणार आहे. त्याच्या यशाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनने अभिनंदन केले आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयने अंडर-१९ आशिया कप स्पर्धेसाठी १५ सदस्यीय संघाची नुकतीच घोषणा केली आहे. यामध्ये जिल्ह्याचा सुपूत्र सचिन धस याची निवड झाली असून भारतीय क्रिकेट संघात निवड झालेला सचिन धस हा बीड जिल्ह्यातील पहिलाच खेळाडू ठरला आहे. सचिनला क्रिडा प्रशिक्षक अजहर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्याच्या यशाबद्दल बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशच्यावतीने अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, आमेर सिद्दीकी, गोपाळ गुरखुदे, सुनील गोपीशेट्टी, सरफराज मोमीन,



अतीक कुरेशी, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

सचिनची निवड जिल्हावासियांसाठी अभिमानास्पद -डॉ.योगेश क्षीरसागर

बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशन हे नेहमीच उमद्या व युवा खेळाडूंच्या पाठीशी असते. सचिन धसला नेहमीच बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे पाठबळ मिळाले आहे. येणार्या काळात सचिन स्वतःच्या दर्जेदार खेळावर नक्कीच भारतीयांचे मन जिंकेल. त्याची निवड जिल्हावासियांसाठी अभिमानास्पद आहे.-डॉ.योगेश क्षीरसागर, कार्याध्यक्ष, बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशन

# भोगलवाडी येथे होत असलेला रस्ता निकृष्ट दर्जाचा

भोगलवाडी (प्रतिनिधी )

भोगलवाडी गावामध्ये होत असलेला रस्ता हा निकृष्ट दर्जाचा होत आहे याबाबत संबंधित अधिकारी कसल्याही प्रकारे दखल न घेता सह्या करतात यामुळे या गावांमध्ये निकराचेनिकृष्ट काम करण्याची पद्धत बदलत नाही. धारूर तालुक्यातील मोठ्या लोकसंख्येची ग्रामपंचायत असणारी भोगलवाडी येथे या अगोदरही अनेक वेळा कामात भ्रष्टाचार झाल्याचे समजते भोगलवाडी येथे गावातील जिल्हा परिषद शाळेजवळदिनांक २१ नोव्हेंबर मंगळवार रोजी होत असलेला रस्ता अत्यंत होत आहे रस्त्यासाठी खडी ना मुरूम ना दबाई ना करता या रस्त्यावर मातीवरच सिमेंट कॉंक्रेट टाकून निकृष्ट दर्जाचे काम केले जात आहे.

याबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभाग संबंधित कामाची पाहणी न करताच बिलावर सह्या करतात असे संबंधित गुत्तेदाराचे म्हणणे आहे यामुळे या निकृष्ट दर्जाच्या कामावर वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील का याबाबत गावकऱ्यातून चर्चा रंगू लागली आहे.



## कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी दातपाडी येथे फळबाग लागवडीबाबत केले शेतकऱ्यांना मार्गर्शन




पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, संलग्नित कृषी महाविद्यालय कोंघारा येथील च्या विद्यार्थिनींनी दातपाडी येथे फळबाग लागवड पद्धत या वर शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. फळबाग लागवडीमध्ये सगळ्यात महत्वाची बाब म्हणजे खड्डा खोदणे आणि भरणे. सगळ्यात आधी झाडातील अंतर किती ठेवायचे हे जाणून घेणे गरजेचे आहे त्यानंतर फळ झाडांच्या प्रमाणे वेगळे वेगळे प्रमाणित माप लक्षात घेऊन खड्डा तय्यार करावा आणि त्यात वाळलेला पाला पाचोळा टाकावा, कुजलेले सोयाबीन किंव्हा तुरीचे कुटार टाकावे नंतर उपलब्ध होईल ते शेणखत, लेंडीखत, गांडूळखत टाकावे, त्या नंतर वाढीसाठी म्हणून सिंगल सुपर फॉस्फेट मातीमध्ये मिक्स करून टाकावे त्याच बरोबर बुरशीनाशक पण टाकने महत्वाचे आहे त्या साठी बुरशीनाशक म्हणून ट्रायकोडर्मा चा वापर करू शकता आणि शेवटी उर्वरीत खड्डा हा मातीने पूर्ण भरून घ्यावा. त्यात मध्यभागी झाडाप्रमाने छोटा खड्डा करून झाड लागवड करून घ्यावी. या पद्धतीने लागवड केल्यास झाडाला पूर्व खत आणि बुर्शीपासून संरक्षण मिळते आणि उत्पन्न चांगले मिळते. ही माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली. या वेळी रासेश्वरी जुमडे, वैष्णवी काळे, सृष्टि गायमुखे, शर्वरी दासोडे, वैष्णवी कोटकर या उपस्थित होत्या. महाविद्यालयाच्या प्राध्यापिका व उद्यानविद्या विभागाच्या विशेषतज्ञ प्रा. रेवती वाघाडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी कृषी महाविद्यालय प्राचार्य डॉ. सविता धोके मॅडम, उद्यान विद्या विभागाचे विशेषतज्ञ प्रा. वैभव काळे सर या सगळ्यांचे मार्गदर्शन लाभले.

# अधीक्षक अभियंता स्वामी यांच्या ढिसाळ नियोजना अभावी विश्रामगृहाच्या उद्घाटनाचा फज्जा

परळी (प्रतिनिधी)

सार्वजनिक बांधकाम विभाग अंबाजोगाई चे अध्यक्ष अभियंता गौरीशंकर स्वामी यांच्या ढिसाळ नियोजना अभावी शासकीय विश्रामगृहाच्या उद्घाटनाचा अक्षरशः फज्जा उडाला. पालकमंत्री तथा कृषी मंत्री नामदार धनंजय मुंडे यांच्या अनुपस्थितीत जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी या विश्रामगृहाचे उद्घाटन केले.

याविषयी अधिक माहिती अशी की, परळी शहरातील शिवाजी चौका जवळ करोडो रुपये खर्च करून शासकीय विश्रामगृह बांधण्यात आले आहे. याचे उद्घाटन आज महाराष्ट्राचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार धनंजय मुंडे यांच्या हस्ते होणार होते. परंतु काही



कारणास्तव नामदार धनंजय मुंडे उद्घाटन समारंभाला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांच्या ऐवजी बीडच्या जिल्हाधिकारी दीपाताई मुधोळ यांच्या हस्ते आज विश्रामगृहाचे उद्घाटन करण्यात आले.या उद्घाटन समारंभास उपविभागीय अधिकारी नम्रता चाटे, स्वतः अधिक्षक अभियंता गौरीशंकर स्वामी व इतर अभियंता उपस्थित होते. तर समोर कार्यक्रमासाठी ठेवण्यात आलेल्या सर्व खुर्च्या रिकाम्या दिसत होत्या.दहा वीस लोक सोडले तर कार्यक्रमाकडे कार्यकर्ते तसेच बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही ही पाठ फिरवल्याचे दिसले.अधीक्षक अभियंता स्वामी यांनी ठरवले असते तर बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी सभागृह भरून गेले असते. तसेच शहरातील इतर नागरिक यांचीही उपस्थिती राहिली असती. परंतु त्यांच्या नियोजन शून्य व ढिसाळ आयोजनाचा फटका या उद्घाटन समारंभाला बसल्याचे दिसत आहे. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी दीपाताई मुधोळ अध्यक्ष अभियंता स्वामी यांच्यावर नाराज झाल्याचे समजते. उद्घाटन समारंभासाठी येणाऱ्या मान्यवर तसेच पाहुण्यांसाठी विश्रामगृहातच जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. लोकांचीच उपस्थिती नसल्याने शेवटी तेथील कर्मचाऱ्यांनाच जेवणावर ताव मारावा लागला.

# श्रीरामपूर परळी रेल्वे मार्गाला निधी कमी पडू देणार नाही : भागवत कराड

शेवगांव(प्रशांत बाफना)

श्रीरामपूर ( बेलापूर ) परळी या रेल्वे मार्गासाठी निधी कमी पडू देणार नसल्याचे आश्वासन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री नामदार भागवत कराड यांनी नेवासाचे माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांना दिले रेल्वे प्रवासी प्रकोष्ट महाराष्ट्र भाजपा अंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथे मराठवाडा रेल्वे परिषद भरवण्यात आली होती या परिषदेसाठी भागवत कराड भाजपचे महामंत्री संजय केनेकर उपस्थित होते महाराष्ट्रातील अन्य भागातून मराठवाड्यात येणाऱ्या रेल्वे मार्गासाठी या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते या परिषदेसाठी नांदेड लातूर परभणी परळी इत्यादी भागातील रेल्वे मार्गासाठी झटणारे पदाधिकारी व जनता उपस्थित होती या परिषदेसाठी नेवासा तालुक्यातून आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी श्रीरामपूर परळी रेल्वे मार्गासाठी एक शिष्ट मंडळ नेले होते आमदार मुरकुटे यांनी श्रीरामपूर परळी



रेल्वे मार्ग संदर्भात संपूर्ण माहिती मंत्री कराड यांना दिली यावर कराड यांनी आमदार मुरकुटे यांना निधीची काळजी करू नका श्रीरामपूर परळी साठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन दिले यावेळी बेलापूर परळी रेल्वे प्रवासी सेवा संस्थेचे सचिव रितेश भंडारी भाजपाचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब फुलारी आप्पासाहेब कावरे अण्णासाहेब गव्हाणे राजेंद्र कीर्तने आदी उपस्थित होते येणाऱ्या केंद्रीयअर्थसंकल्पात या रेल्वे मार्गाला मंजुरी देऊन भरघोस निधी द्यावा व तातडीने या रेल्वे मार्गाचे काम सुरू करावे अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.



विश्वकर्मा योजनेत बीड जिल्ह्याचा समावेश केल्याबद्दल तसेच पिक विमा रक्मेतुन कर्ज वसुली स्थगितीस जिल्हा प्रशासनाला सुचना केल्याबद्दल बीड जिल्ह्याच्या लोकप्रिय दबंग पर्मनंट खासदार डॉ प्रितमताई गोपीनाथराव मुंडे साहेब यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त करताना वैद्यनाथ सहकारी साखर कारखाना गोपीनाथ गड पांगरी संचालक तथा भाजपा नेते राजेश गिते समवेत परळी वैजनाथ भाजपा तालुका उपाध्यक्ष

## आज थोरले पाटंगण येथे अमृत महाराज जोशी यांचे काल्याचे किर्तन तर महाप्रसादाचे आयोजन

बीड (प्रतिनिधी)

येथील श्रीसंत जनीजनार्दन स्वामी महाराज थोरले पाटंगण संस्थान यांच्या ४२३ व्या प्रतिवार्षिक महोत्सवानिमित्त आज मंगळवार दि. २८ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ठीक नऊ वाजता आचार्य श्री अमृताश्रमस्वामी महाराज (श्री अमृत महाराज जोशी,नवगण राजुरीकर) यांचे काल्याचे किर्तन संपन्न होणार असून दुपारी एक ते पाच महाप्रसाद होणार आहे. बीड शहरातील महिला, पुरुष भाविकभक्तांनी महाप्रसादास सहपरिवार उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन थोरले पाटंगण संस्थान, पाटंगण गल्ली बीड, पाटंगणकर परिवार,यांच्या वतीने करण्यात आले आहे तर बुधवार दिनांक २९ नोव्हेबर रोजी सकाळी सहा वाजता मठाधिपती विनायक धुंडिराज महाराज यांचे लळीताचे



कीर्तन संपन्न होणार असून संस्थानच्या महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या सर्वच कार्यक्रमाचा महिला,पुरुष भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संस्थानच्या वतीने मठाधिपती श्री. विनायक धुंडीराजशास्त्री पाटंगणकर यांनी केले आहे.

# नातवाच्या वाढदिवसानिमित्त आजोबा कडून श्री क्षेत्र चारदरीत केले अन्नदान

## महारुद्र बडे याचा वाढदिवस जागृत हनुमान देवस्थान चारदरी येथे अन्नदान करून केला साजरा

भोगलवाडी (प्रतिनिधी)

धारूर तालुक्यातील श्रीक्षेत्र चारदरी याठिकाणी दर आठवड्याच्या शनिवारी भावार्थ रामायण व नंतर अन्नदात्यांकडून अन्नदान केले जाते यामध्ये दि.२५नोव्हेंबर शनिवार रोजीचे अन्नदान गावंदरा येथील संभाजी बडे यांच्याकडून आपल्या नातवाच्या वाढदिवसानिमित्त करण्यात आले .धारूर तालुक्यातील डोंगरदऱ्यातील प्रसिद्ध देवस्थान श्री.क्षेत्र चारदरी येथे जागृत हनुमान मंदिर या ठिकाणी दर आठवड्याला प्रत्येक शनिवारी सकाळी ११ ते दुपारी ०२ वाजेपर्यंत भावार्थ रामायन कथा चालते यानंतर बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातून अनेक अन्नदाते अन्नदान



करतात या ठिकाणी हजारो भाविक उपस्थित असतात या ठिकाणी दि.२६नोव्हेंबर २०२३ रोजीची शनिवारची पंगत गावंदरा येथील संभाजी पंढरीनाथ बडे यांनी आपला नातू महारुद्र गोवर्धन बडे यांच्या वाढदिवसानिमित्त मोठ्यां तन मन धनाने अन्नदान केले या ठिकाणी हजारो भाविकांची उपस्थिती होती यावेळी बीड जिल्ह्यातील वाचक सूचक महंतांच्या वतीने महारुद्र बाळाला वाढदिवसानिमित्त उदंड आयुष्याच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## खा. डॉ प्रितमताई मुंढे यांच्या हस्ते उद्घाटन प्रसंगी उपस्थित रहावे -युवा नेते ईश्वर बिक्कड

केज (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्याच्या लोकप्रिय खासदार डॉक्टर प्रीतम ताई मुंडे यांच्या कार्य कुशल नेतृत्वामुळे बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा चेहरा मोहरा बदलत आहे यावेळी बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये आज कट्टर रूपाचे काम आनंद मुंडे भगिनींनी आज स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या नंतर विकासाची गंगा ही अखंड वाहत ठेवत असल्यामुळे आज सुद्धा बीड जिल्ह्यामध्ये स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची विकास ही जात आणि विकास हाच धर्म हे ब्रीदवाक्य घेऊन लोकनेते पंकजाताई मुंडे व लोकप्रिय खासदार प्रीतम ताई मुंडे यांनी कार्य करत वेगवेगळ्या कामाच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये स्वतःच्या कामाचे माध्यमातून बीड जिल्ह्यातील जनतेला कसा फायदा होईल व वेगवेगळ्या शासनाच्या योजना केंद्र व राज्य शासनाकडून खेचून आणत सत्तेमध्ये असताना सुद्धा नसल्यासारखे वाटत असल्याने आज विरोधकांना तोंड कशी पडावे लागत आहे लोकनेते पंकजाताई व प्रीतम ताई या विकास कामावर जोर देत जनसेवा करण्यास सदैव कटिबद्ध आहेत म्हणून तर आज रोजी केस तालुक्यात कार्यक्रम दि २७/११/२०२३ सांगवी(सां)ता केज येथे होणाऱ्या उठऋ केंद्रीय मार्ग निधी व प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत झालेल्या कामाच्या लोकार्पण सोहळ्यास सर्व केज तालुक्यातील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी या सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती ठिकाण :- सांगवी (सां) वेळ :- सायं ५:०० वा असे उपस्थित रहावे असे आव्हान युवा नेते ईश्वर बिककड यांनी केले आहे

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT